## आदेश निशाणी क्र. ७५

( पारीत दिनांक २० माहे जानेवारी २०२६ )

०१. वादीने सदरच्या अर्जाद्वारे प्रतिवादी म्हणून अर्जामध्ये नमूद केलेल्या लोकांना समाविष्ट करण्यासाठी आणि त्या अनुषंगाने दाव्याच्या वादकथनकामध्ये मजकूर समाविष्ट करण्यासाठी परवानगी द्यावी, अशी मागणी केलेली आहे.

०२. वादीनुसार, त्याने वाटप, पृथक ताबा आणि खरेदीखते मुलतः रद्दबातल असल्याने त्याच्यावर बंधनकारक नाहीत, अशा जाहीरनाम्याची मागणी केलेली आहे आणि दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. ७ ते १० यांनी दावा मिळकतीतील त्याचे हक्क डावलण्याच्या हेतुने आणि गुंतागुंत निर्माण होवून सुनावणी लांबणीस पडावी या हेतुने विविध खरेदीखते विना मोबदला आणि विना ताबा नातेवाईकांच्या हक्कात नोंदवून दिलेले आहे. ती दावा प्रलंबित असण्याच्या दरम्यानची असल्यामुळे त्याच्या हक्कावर बंधनकारक ठरत नाहीत. तेव्हा त्याच्यानुसार, त्या खरेदीखतातील खरेदीदार यांना दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे आणि त्या खरेदीखताअनुषंगाने दाव्याच्या वादकथनकामध्ये अर्जामध्ये नमूद केलेले परिच्छेद क्र. ९/अ ते ९/ई समाविष्ट करणे आवश्यक आहे. शिवाय त्या अनुषंगाने दाव्याच्या वाद आणि विनंती रकान्यामध्ये देखील दुरुस्ती समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्याच्यानुसार, त्याने प्रस्तावित केलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही. शिवाय प्रतिवादींच्या बचावावर गदा देखील येत नाही. त्यामुळे पक्ष संयोजन आणि वाद कथनकातील दुरुस्तीला परवानगी द्यावी, अशी त्याने विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादी क्र. ७ ते १० यांनी निशाणी क्र. ७७ वर म्हणणे देवून अर्जाला विरोध केलेला आहे. त्यांच्यानुसार, सदर प्रकरणात सन २०२३ मध्ये मुद्दे निश्चित झालेले आहेत. प्रस्तुत प्रकरण दिनांक २६.०६.२०५ रोजी खारीज करण्याच्या आदेशासाठी नेमलेले होते. अशा परिस्थितीमध्ये वादीचा पक्ष संयोजन आणि वाद कथनकातील दुरुस्तीचा अर्ज टिकणारा नाही. त्यांच्यानुसार, त्यांनी दिनांक ३०.०१. २०२० रोजी लेखी कैफियत दाखल करुन उपरोक्त खरेदीखताबाबत बचाव घेतलेला असतानाही वादीने सदरचा अर्ज हा विलंबाने दिलेला आहे. ज्यामुळे वादीच्या दाव्याला आवश्यक पक्ष असंयोजनाची आणि आवश्यक मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट न करण्याची बाधा येते, ज्याबाबत त्यांनी बचाव घेतलेला आहे. तेव्हा त्यांच्यानुसार, वादीचा अर्ज मंजूर केला तर त्यांचा बचाव खारीज होणार आहे. त्यांच्यानुसार, निशाणी क्र. ५१ वरील अर्जाद्वारे उपरोक्त व्यक्तींनी त्यांना दाव्यामध्ये पक्षकार म्हणून समाविष्ट करावे, अशी विनंती केली होती; परंतु वादीच्या जोरदार विरोधामुळे दिनांक १६.०३.२०२३ रोजी तो अर्ज नामंजूर झाला. ज्याविरुद्ध मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र. ८१९०/२०२३ दाखल केल्या गेली, जी फेटाळल्या गेली. दोन्हीही न्यायालयात वादीने म्हणणे दाखल करुन त्यांना पक्षकार करण्याची गरज नाही, असा बचाव घेतला होता. तेव्हा त्यांच्यानुसार आता वादी सदरच्या व्यक्तींना दाव्याचे आवश्यक पक्ष म्हणून समाविष्ट करण्याची मागणी करू शकत नाही आणि त्या अनुषंगाने सदरचे खरेदीखते त्याच्यावर बंधनकारक नाहीत, अशीही मागणी त्याला करता येणार नाही. त्यामुळे त्याने अर्ज नामंजूर करावा आणि यदाकदाचित तो मंजूर करण्याच्या अटीपर्यंत न्यायालय आले तर वादीवर रुपये ४०,०००/— दंडात्मक परीव्यय लादून त्यांना प्रत्येकी रुपये १०,०००/— भरपाई म्हणून द्यावा, अशी विनंती

केलेली आहे.

०४. वादीच्या वतीने वकील श्री. व्ही. आर. खवले यांना ऐकले तर प्रतिवादींसाठी वकील श्री. एस. एस. खरसडे यांना ऐकले.

०५. पक्ष संयोजनाच्या अनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता ( यापुढे सोयीसाठी '**संहिता**' असा उल्लेख केला जाईल ) च्या आदेश १ नियम १०(२) अन्वये न्यायालयास स्वेच्छाधिकार दिलेला आहे की, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर पक्षकारांच्या अर्जावरून, किंवा अर्जाशिवाय, न्यायालयाला न्यायोचित वाटेल त्या अटीवर आणि ज्यावेळी न्यायालयाला एखाद्या व्यक्तीचे नाव दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून समाविष्ट केले जाणे आवश्यक वाटत असेल आणि त्या व्यक्तीची प्रकरणात उपस्थिती आवश्यक असते जी त्या दाव्यामध्ये उपस्थित झालेल्या विवादाचा निपटारा आणि अंतिम निर्णय होण्यासाठी आवश्यक असते तर तशा पक्षकार संयोजनाला मान्यता देईल. तर वाद कथनकातील दुरुस्तीच्या अनुषंगाने संहितेच्या आदेश ६ नियम १७ खालील तरतुदीनुसार न्यायालयास स्वेच्छाधिकार दिलेला आहे की, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही पक्षाला त्यांच्या वादकथनकामध्ये बदल किंवा दुरुस्ती करण्यास परवानगी दिली जाईल. अशा रितीने आणि अटीवर ज्या न्यायोचित असू शकतील आणि अशा सर्व दुरुस्ती मंजूर केल्या जातील. ज्या पक्षकारातील विवाद निर्णयीत करण्याच्या हेतुने त्या आवश्यक असतील; परंतु सदर तरतुदीच्या परंतुकामध्ये न्यायालयाच्या स्वेच्छाधिकरावर बधंन घातलेले आहे की, न्यायालयाकडून अशी दुरुस्ती मंजूर केली जात असताना हे पाहावे आणि ती त्याचवेळी

मंजूर करावी ज्यावेळी पक्षकार संपरीक्षा सुरू करण्याच्या पूर्वी दुरुस्तीमधील मजकूर न्यायालयासमक्ष दक्षता बाळगूनही आणू शकला नव्हता, हे त्याने दाखवून द्यावे. एकंदरीत उपरोक्त तरतुदीच्या पार्श्वभुमीवर हातातील प्रकरणामध्ये पक्ष संयोजन आणि वाद कथनकातील दुरुस्ती मंजूर करणे आवश्यक आहे का हे पाहणे उचित होईल.

०६. श्री. खवले यांनी असे निवेदन केले की, प्रतिवादी क्र. ७ ते १० यांनी वादींचे दावा मिळकतीतील हक्क डावलण्याच्या, दाव्यात गुंतागुंत निर्माण करुन तो प्रलंबीत ठेवण्याच्या, वादींना आर्थिक, सामाजिक आणि मानसिक त्रास व्हावा या हेतुने आणि त्या मिळकती हडप करता याव्यात म्हणून त्यांच्या नातेवाईकांनां अर्जामध्ये नमूद केलेली खरेदीखते विना मोबदला आणि विना ताब्याची नोंदवून दिलेले आहेत. तेव्हा त्यांच्यानुसार, अर्जामध्ये नमूद केलेल्या व्यक्तीं विना मोबदला आणि विना ताबा दावा मिळकतीचे खरेदीदार असल्याने त्यांचे खरेदीव्यवहार आणि ती खरेदीखते वादीच्या हक्कावर बंधनकारक नाहीत, तेव्हा त्यानुषंगाने ते खरेदीदार हे दाव्याचे आवश्यक पक्ष आहेत आणि त्यांच्या खरेदीखताच्या अनुषंगाने अर्जामध्ये नमूद केल्यानुसारची दुरुस्ती समाविष्ट करणे न्यायोचित आहे. त्यांच्यानुसार, दावा प्रलंबित असताना सदरची खरेदीखते झालेली असल्याने ती मुळत: रद्दबातल ठरतात. तेव्हा त्या संदर्भाने वादींना जाहीरनाम्याची मागणी करणे गरजेचे आहे. त्यांनी असेही निवेदन केले की, प्रस्तावित केलेली दुरुस्ती आणि पक्ष संयोजन हे आवश्यक आहे, तेव्हा ती मंजूर करावी. त्यांनी पुढे असेही निवेदन केले की, वादीने जाणीवपूर्वक दुरुस्ती करण्यास टाळाटाळ केलेली नाही तर अनवधानाने ती करण्याचे राहून गेलेले आहे. तेव्हा त्यांनी

अर्ज मंजूर करावा, अशी विनंती केलेली आहे.

०७. श्री. खरसडे, प्रतिवादींचे वकील यांनी असे निवेदन केले की, निशाणी क्र. ३४ वरील लेखी कैफियतीनुसार प्रतिवादींनी दिनांक ३०.०१.२०२० रोजीच वादीला उपरोक्त खरेदीखताबाबत माहिती दिली होती; परंतु त्या खरेदीदारांनी जेव्हा त्यांना दाव्यामध्ये पक्षकार म्हणून समाविष्ट करावे, अशी मागणी करणारा अर्ज निशाणी क्र. ५१ वर केली तेव्हा वादीने त्या अर्जाला जोरदार विरोध केला, म्हणून तो अर्ज नामंजूर झाला, तेव्हा त्यांच्यानुसार, आता वादीला ते खरेदीदार आवश्यक पक्ष आहेत असे म्हणता येणार नाही आणि त्या अनुषंगाने त्यांच्या वाद कथनकामध्ये दुरुस्ती सुद्धा मागता येणार नाही. तेव्हा त्यांच्यानुसार, वादीचा अर्ज हा गुणवत्तापूर्ण नाही तर खोटा आहे. तेव्हा तो नामंजूर करताना वादीवर दंडात्मक परीव्यय लादून तो प्रतिवादींना भरपाई म्हणून द्यावा.

०८. उपरोक्त कायदेशीर स्थिती आणि दोन्ही पक्षाच्या वकिलांचा युक्तीवाद याच्या पार्श्वभूमीवर वादीने प्रस्तावित केलेले पक्ष संयोजन आणि वादकथनकातील दुरुस्ती आवश्यक आहे का, या अनुषंगाने पडताळणी केली असता वादीचा दावा हा दावा मिळकतीचे वाटप होवून त्यातील त्याच्या हिश्याचा पृथक ताबा त्याला मिळावा आणि विविध खरेदीखते ही त्याच्या हक्कावर बंधनकारक नाहीत, असा जाहीरनामा मिळावा, यासाठी दाखल केलेला आहे. वादी या अर्जाद्वारे दावा प्रलबिंत असण्याच्या कालावधीमध्ये प्रतिवादी क्र. ७ ते १० यांनी त्यांच्या नातेवाईकांना दावा मिळकतींची विना मोबदला आणि विना ताबा खरेदीखते नोंदवून दिल्याचा दावा करुन त्यांना दाव्याचे आवश्यक पक्ष असल्याने संयोजित करावे आणि त्या

अनुषंगाने वादकथनकामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी करीत आहे.

०९. हे नाकारण्याचे कारण नाही की, श्री. खरसडे यांनी युक्तीवाद केल्यानुसार, वादीने ज्या व्यक्तींना आता सदर दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून संयोजन करण्याची मागणी करीत आहे, त्यांनी केलेल्या अर्जाला जोरदार विरोध केला होता आणि माझ्या पूर्व पीठासन अधिकारी यांनी दाव्यामध्ये कोणाला पक्षकार करावे, यासाठी वादीला सांगण्याची गरज नाही आणि त्याने कोणासोबत विवाद करावा, याचे त्याला स्वातंत्र्य आहे, या वादीच्या बचावावरून त्यांचा अर्ज नामंजूर केला होता; परंतु आता जेव्हा वादीच्या हे लक्ष्यात आलेले आहे की, सदरचे खरेदीदार हे दाव्यामध्ये आवश्यक पक्ष आहेत, तेव्हा असे म्हणता येणार नाही की, वादीची ती मागणी अप्रस्तूत आहे. हे निश्चित की, दावा प्रलंबीत असण्याचा काळात दावा मिळकतीबाबत झालेल्या व्यवहाराचे खरेदीदार यांच्यावर दाव्यात होणारे निर्णय प्रतिवादींवर जेवढे बंधनकारक असतात तेवढेच त्यांच्या खरेदीदारावर असतात, तेव्हा त्यांना पक्षकार केले काय, की नाही, याचा परिणाम वादीच्या हक्कावर होत नाही; पंरतु जेव्हा दावा प्रलंबीत आहे आणि वादीस वाटते की, त्या खरेदीदारांना दाव्यामध्ये पक्षकार केले तर अंतिम न्यायनिर्णय होण्यासाठी ते उचित आणि लाभदायक होणार आहे, तर वादीची मागणी नाकारणे उचित होणार नाही. शिवाय या खरेदीदारांची त्यांना दाव्यामध्ये पक्षकार होण्याची ईच्छाही होती, जी वादीच्या मागणीद्वारे पूर्ण होणार आहे, तेव्हा त्यांना पूर्वग्रह होतो, असेही म्हणता येणार नाही. एकंदरीत हे सुस्पष्ट आहे की, प्रस्तावीत प्रतिवादी हे दाव्याचे उचित असे पक्षकार आहेत, तेव्हा त्यांच्या उपस्थितीने न्यायालयाला दाव्याच्या अंतिम निर्णयामध्ये मदत

होणार आहे, म्हणून त्यांना दाव्यात पक्षकार करणे आवश्यक आहे.

१०. राहिला प्रश्न वादकथनकातील दुरुस्तीबाबत तर जेव्हा प्रस्तावीत प्रतिवादी हे दाव्यात उचित पक्षकार म्हणून समाविष्ट करण्यायोग्य आहेत, तर त्यांच्या खरेदी व्यवहारांबाबत जी काही वादीने त्याच्या दाव्याच्या वादकथनकामध्ये दुरुस्ती प्रस्तावीत केलेली आहे ती ही आवश्यक आहे. अशा दुरुस्तीशिवाय प्रस्तावीत प्रतिवादींना पक्षकार करण्याचा उद्‌देश साध्य होणार नाही. तेव्हा वादीने प्रस्तावीत केलेली दुरुस्तीही मान्य करणे गरजेचे आहे. हे सुस्पष्ट आहे की, जेव्हा दावा हा वाटपाचा आहे आणि वादी त्याच्या हिश्याच्या मिळकतीचा पृथक ताबा मागणी करीत आहे त्यावेळी ज्या ज्या मिळकती वडिलोपार्जित आणि एकत्रित कुटुंबाच्या आहेत त्या—त्या दाव्यामध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे आणि त्यांची जर पक्षकारांनी विल्हेवाट लावली असेलतर ते खरेदीदार देखील दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार ठरतात. कारण दावा जर का मंजूर झाला आणि वादीचा हिस्सा सुनिश्चित करुन तो विभक्त करुन देण्याचा प्रश्न आला तर संपूर्ण मिळकतींचे एकत्रितकरण करणे आवश्यक ठरते आणि त्यातुन वादीचा हिस्सा विभक्त करावा लागतो, अन्यथा असे मिळकतीचे विभक्तीकरण करणे सुलभ ठरणार नाही. अशा परिस्थितीमध्ये दावा प्रलंबित असण्यादरम्यानचे खरेदीदार दाव्याचे आवश्यक पक्ष ठरतात आणि त्यांच्या पक्षकर संयोजनानुषंगाने त्यांच्या खरेदी व्यवहारासबंधीची दुरुस्ती देखील दाव्याच्या वादकथनकाचा भाग ठरेल.

११. राहिला प्रश्न पूर्वी खरेदीदाराचा अर्ज नामंजूर होण्याच्या पार्श्वभूमीचा तर त्या अर्जाच्या नामंजूरीमुळे ते सर्वजन दाव्याचे

आवश्यक पक्षकार नाहीत, असे म्हणता येत नाही. शिवाय त्यांच्या पक्षसंयोजनामुळे त्यांनाही संधी मिळेल की, त्यांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी दाव्यामध्ये बचाव घ्यावा. असे जरी असले तरी ही बाब देखील नजरेआड करता येणार नाही की, प्रस्तावीत प्रतिवादींच्या खरेदीव्यवहाराबाबत प्रतिवादींनी त्यांच्या लेखी कैफियत निशाणी क्र. ३४ मध्ये दिनांक ३०.०१.२०२० रोजी वादीने अर्जामध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त दाव्याचे आवश्यक पक्षकार आहेत, तेव्हा त्यांच्या पक्षसंयोजनाअभावी दावा बाद ठरतो आणि दाव्यामध्ये आवश्यक मिळकतींना समाविष्ट न केल्यामुळे देखील तो बाद ठरतो, असा आक्षेप घेतलेला आहे; तेव्हा वादीला असेही म्हणता येणार नाही की, त्याला या अर्जामध्ये नमूद केलेल्या खरेदी व्यवहाराबाबत पूर्वकल्पना नव्हती. असे आतानाही त्याने सदरचा अर्ज देण्यासाठी ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी घेतलेला आहे आणि अशा विलंबासाठी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. केवळ दावा प्रलंबित आहे आणि अद्याप संपरीक्षा संपलेली नाही, एवढ्या कारणावरुन सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे; परंतु वादीने सदरच्या व्यक्तींना स्वत:हुन दाव्यामध्ये पक्षकार होण्याची ईच्छा व्यक्त केली, तेव्हा जोरदार विरोध केला, हे लक्षात घेतले तर पाच वर्षानंतर जाग आलेल्या वादीवर परीव्यय लादणे आवश्यक आहे, जेणेकरून ना केवळ दाव्याला तोंड देणा—या प्रतिवादींना भरपाई देता येईल, तर प्रस्तावीत प्रतिवादींना देखील पूर्वी हजर होण्यासाठी जो त्यांनी खर्च केला, त्याची भरपाई देणे आवश्क आहे. शिवाय वादीच्या दिरंगाईमुळे शासनाचा जो खर्च वाढणार आहे, तो देखील भरपाई होणे आवश्यक आहे. तेव्हा अर्ज मंजूर करताना खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

## आदेश

**१.** अर्ज विनंतीप्रमाणे वादीने पुढील तारखेपर्यंत दाव्याला तोंड देत असलेले प्रतिवादी क्र. ८ ला रुपये २,०००/— परीव्यय दिल्यावरून; प्रस्तावित केलेल्या प्रत्येक प्रतिवादीला प्रत्येकी रुपये १,०००/— भरपाई म्हणून देण्याचे मान्य करणारे प्रतिज्ञाकथन केल्यावरून आणि कार्यवाहीचा खर्च म्हणून रुपये २,०००/— शासनजमा केल्यावरून मंजूर करण्यात येत आहे;

**२.** वादीने उपरोक्त पुर्तता केल्यावरुन त्याला दाव्याच्या मथळा रकान्यामध्ये अर्जामध्ये नमूद केलेल्या व्यक्तींना प्रतिवादीं म्हणून समाविष्ट करण्यास आणि वादकथनकामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी दिली जाईल;

**३.** परिव्यय वादी/अर्जदार यांच्यावर राहील.

Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.01.28 11:26:34 +0530

दिनांक: २०/०१/२०२६.

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Botre (Grade-II) |
| Name of Court | : | Civil Court Senior Division<br>Bhoom Tq. Bhoom<br>Dist.Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 20.01.2026 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 22.01.2026 |
| Order/ Judgment uploaded on | : | 22.01.2026 |